# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
## MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION

**मुख्य कार्यालय**

बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई ४००००१ ☎२२६७ ०२१० /१४८ /२४८,२२६०२२२२ फॅक्स : २२६७३९१५

Bank of India Bldg, 3rd fl oor, Mahatma Gandhi Road, Hutatma Chowk, Mumbai 400001 ☎2267 0210 /148 /248, 22602222 Fax : 22673915

**माझगांव कार्यालय**

विक्रीकर भवन, ९ वा मजला,रुम नंबर ९१५, सरदार बलवंतसिंग दोधी मार्ग, माझगांव, मुंबई ४००२०३ ☎ २३७४२१९१ फॅक्स : २३७८१०६१

Vikrikar Bhavan, 9th floor, Room No.915, Sardar Balvantsing Dodhi Marg, Mazgaon, Mumbai 400203 ☎23742191 Fax : 23781061

ई-मेल sec.mpsc@maharashtra.gov.in, mpscpre@gmail.com वेबसाईट – www.mpsc.gov.in


## महाराष्ट्र अभियांत्रिकी (स्थापत्य) सेवा (मुख्य) परीक्षा - २०१३

**धारिका क्रमांक : ३७४(१)एक(१)/२०१३/तीन**

**अधिसूचना क्रमांक : १२४/२०१३**

जाहिरात क्रमाक ६२/२०१३, दि.१३ सप्टेंबर, २०१३ नुसार शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग व पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकरिता सहायक कार्यकारी अभियंता गट-अ, सहायक अभियंता श्रेणी-१, गट-अ या पदासाठी आयोगामार्फत दि.२० ऑक्टोबर, २०१३ रोजी घेण्यात आलेल्या **महाराष्ट्र अभियांत्रिकी (स्थापत्य) सेवा गट-अ (पूर्व) परीक्षा २०१३च्या निकालाआधारे मुख्य परीक्षेसाठी अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांची महाराष्ट्र अभियांत्रिकी (स्थापत्य) सेवा गट-अ (मुख्य) परीक्षा - २०१३ ही शनिवार व रविवार, दिनांक ११ व १२ जानेवारी, २०१४ रोजी औरंगाबाद, मुंबई, नागपूर व पुणे या चार जिल्हा केंद्रांवर घेण्यात येईल. प्रस्तुत मुख्य परीक्षेकरिता उमेदवारांनी पूर्व परीक्षेकरिता ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या अर्जातील माहितीच्या आधारेच मुख्य परीक्षेचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरणे आवश्यक आहे. जे उमेदवार अर्जामध्ये चुकीची माहिती सादर करतील त्यांना या व या पुढील सर्व निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.**

**२. उपलब्ध पदसंख्या :-**

| अ. क्र. | पदाचे नाव व एकूण पदसंख्या | अराखीव | अ.जाती व त्यातील बौध्द धर्मांतरित | अनुसूचित जमाती | उन्नत व प्रगत गटात न मोडणारे | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | वि.जा. (अ) | भ.ज.(ब) | वि.मा.प्र. | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | इ.मा.व. |
| **सार्वजनिक बांधकाम विभाग** | | | | | | | | | | |
| १ | **सहायक कार्यकारी अभियंता,गट-अ (एकूण पदे-१३)** | ४ | २+१* | ३* | -- | १* | -- | -- | -- | २ |
| | महिला | १ | १ | १ | -- | -- | -- | -- | -- | १ |
| | खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | शारीरिक विकलांगता | चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू - १ पद | | | | | | | | |
| २ | **सहायक अभियंता,श्रेणी-१ गट-अ (एकूण पदे- ६५)** | २० | ८+४* | १+८* | २ | -- | १ | २+१* | -- | १०+८* |
| | महिला | ६ | ४ | ३ | -- | -- | -- | १ | -- | ५ |
| | खेळाडू | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ |
| | शारीरिक विकलांगता | एकूण ३ पदे चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू - २ पदे व श्रवणशक्तीतील दोष -१ पद | | | | | | | | |
| **जलसंपदा विभाग** | | | | | | | | | | |
| १ | **सहायक कार्यकारी अभियंता, गट-अ(एकूण पदे-९६)** | ४७ | १२ | ६ | ३+१* | २ | २ | ३ | २ | १७+१* |
| | महिला | १४ | ४ | २ | १ | -- | -- | १ | -- | ५ |
| | खेळाडू | २ | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | १ |
| | शारीरिक विकलांगता | -- | | | | | | | | |
| २ | **सहायक अभियंता, श्रेणी-१ गट-अ(एकूण पदे-१५८)** | ७७ | २०+७* | ११ | ३ | ३+१* | ३ | ५+५* | २ | २०+१* |
| | महिला | २३ | ८ | ३ | १ | १ | १ | ३ | १ | ६ |
| | खेळाडू | ४ | १ | १ | -- | -- | -- | -- | -- | १ |
| | शारीरिक विकलांगता | एकूण ५ पदे चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू - २ पदे व श्रवणशक्तीतील दोष -३ पदे | | | | | | | | |
| **पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग** | | | | | | | | | | |
| १ | **सहायक कार्यकारी अभियंता,गट-अ (एकूण पदे-९१)** | ४४ | ११ | ७ | २ | २ | २ | ४ | २ | १७ |
| | महिला | १३ | ३ | २ | -- | -- | -- | १ | -- | ५ |
| | खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | शारीरिक विकलांगता | एकूण ३ पदे चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू - २ पदे व श्रवणशक्तीतील दोष -१ पद | | | | | | | | |
| २ | **सहायक अभियंता, श्रेणी-१ गट-अ (एकूण पदे- ५९)** | २९ | ७ | ४ | १ | २ | २ | २ | १ | ११ |
| | महिला | ९ | २ | १ | -- | -- | -- | -- | -- | ३ |
| | खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | शारीरिक विकलांगता | एकूण २ पदे चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू - १ पद व श्रवणशक्तीतील दोष -१ पद | | | | | | | | |

**टिप** :- * अशी खुण केलेली पदे अनुशेषाची आहेत.

**२.१** वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणात शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**२.२** महिलांसाठी व खेळाडूंसाठी आरक्षित असलेली पदे सबंधित वर्गवारीतील भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

**२.३** महिलांसाठी असलेले आरक्षण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग,क्रमांक ८२/२००१/म.से.आ.२०००/ प्र.क्र.४१५/ का-२, दिनांक २५ मे,२००१ आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

**कृ.मा.प.**

२.४ खेळाडूंचे आरक्षण शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील. खेळाडू वर्गवारीसाठी दावा करणा-या उमेदवारांनी त्यांची खेळाडूबाबतची प्रमाणपत्रे, मुलाखतीस बोलाविले गेल्यानंतर, मुलाखतीपूर्वी संचालक, क्रिडा व युवक संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडून प्रमाणित करुन घ्यावीत.

२.५ शारीरिक विकलांगता प्रवर्गासाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

२.६ शारीरिक विकलांगता प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या पदावर स्पर्धा परीक्षेद्वारे शिफारस करताना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे, याचा विचार न करता गुणवत्ता क्रमानुसार त्याची शिफारस करण्यात येईल.

२.७ शारीरिक विकलांग उमेदवारांना गुणवत्तेनुसार लेखनिकाची मदत घेता येईल.

२.८ प्रस्तुत पदांना शासनाने दिनांक ८ जून, २०१० रोजी निर्गमित केलेली "महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने नियुक्तीसाठी विभागीय संवर्ग संरचना व विभागीय संवर्ग वाटप याबाबत नियमावली २०१० " लागू आहे.

**३. सदर परीक्षा खालील दोन टप्प्यात घेण्यात येईल.**

**३.१ लेखी परीक्षा : एकूण ७५० गुण. (यामध्ये वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाचा एक पेपर १५०/- गुणांचा व पारंपारिक स्वरुपाचे एकूण ३ पेपर प्रत्येकी २०० गुणांचे असतील.)**

**३.२ मुलाखत १०० गुण.**

**३.३ सदर मुख्य परीक्षेमधून मुलाखतीकरिता पात्र होण्याकरिता किमान गुणांचे निकष म्हणून परसेंटाईल (percentile) पध्दत वापरली जाईल. अमागास, मागास व खेळाडू/अपंग उमेदवारांकरिता किमान परसेंटाईल (percentile)अनुक्रमे ३५%, ३०%, २०% राहील.**

**४. पात्रतेविषयक अटी :-**

**४.१** भारतीय नागरिक.

**४.२ वयोमर्यादा - १ जानेवारी, २०१४ रोजी किमान १९ वर्षे असावे व ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे.**

**४.३** उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम :-

**४.३.१** महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवारांकरिता ५ वर्षांपर्यंत शिथिलक्षम.

**४.३.२** पात्र खेळाडूंच्या बाबतीत ५ वर्षांपर्यंत शिथिलक्षम.

**४.३.३** माजी सैनिकांसाठी व आणीबाणी व अल्पसेवा राजादिष्ठ अधिकारी यांचेसाठी शासन निर्णयानुसार ५ वर्षे शिथिलक्षम.

**४.३.४** शारीरिक विकलांग उमेदवारांसाठी ४५ वर्षांपर्यंत शिथिलक्षम.

**४.३.५ शैक्षणिक अर्हता:-** दोन्ही पदांसाठी मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकीमधील पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने पदवीच्या समतुल्य म्हणून मान्य केलेली अर्हता.

**४.३.६** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक

**४.३.७** शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्रमांक: डीसीएस -१०८९/२१४८/का. सेवा -३,दिनांक २५ एप्रिल, १९९० व शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक जीटीआय/१०९८/१४५७९/(२३०/९८) ता.शि २, दि.१५ मार्च, १९९९ शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक न्यायप्र-१००५/(३०/०५) तांशि-२, दि.१८ जुलै, २००५ तसेच, इतर प्रचलित शासन निर्णयान्वये समकक्ष अर्हता धारण करीत असलेले उमेदवारही अर्ज करण्यास पात्र ठरतील.

**४.३.९ महाराष्ट्र अभियांत्रिकी (स्थापत्य) सेवा गट-अ (मुख्य) परीक्षा २०१३ करिता अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांक पर्यंत** उमेदवारांनी पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

**६. शुल्क : ६.१** अमागास - रु. ४१५/- **६.२** मागासवर्गीय - रु. २१५/- **६.३** माजी सैनिक - रु.१५/-

**७. अर्ज करण्याची पद्धत :-**

**७.१** प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

**७.२** पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based)ऑनलाईन अर्ज www.mahaonline.gov.in या वेबसाईटद्वारे **दिनांक १९ डिसेंबर, २०१३ ते ४ जानेवारी, २०१४ या कालावधीत** सादर करणे आवश्यक राहील.

**७.३** ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत

**७.४** विहित पद्धतीने आयोगास अर्ज सादर केल्यानंतर परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

**७.५** आयोगाने निश्चित केलेले परीक्षा शुल्क खालील पध्दतीने भरता येईलः-

**७.६** आयोगाने निश्चित केलेले परीक्षा शुल्क खालील पद्धतीने भरता येईल :-

(१) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे (२) नेटबँकिंग (३) डेबिट कार्ड. (४) क्रेडिट कार्ड. (५) संग्राम केंद्र / सीएससी (नागरिक सेवा केंद्र)

**७.७** www.mahaonline.gov.in येथे संग्राम केंद्र (ग्रामपंचायतीमध्ये) आणि सीएससीची सूची उपलबध आहे.

**७.८** परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा :-

(१) शुल्क भरण्याकरिता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील " माझे खाते " या लिंक वर क्लिक करावे.

(२) " माझे खाते " " या लिंक वर क्लिक केल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर " 'Unpaid' असे लिहिलेले असेल, त्या ठिकाणी " 'Pay Now' अशी लिंक उपलब्ध असेल.

(३) "" Pay Now " या लिंक वर क्लिक केल्यानंतर 3 पर्याय उपलब्ध होतील. 1. ऑनलाईन पेमेंट 2. नागरी सुविधा केंद्र 3. चलानद्वारे

(४) उमेदवार क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन पेमेंट करु शकतील.

(५) नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो. उपरोक्त कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.

(६) उमेदवाराने चलनाद्वारे हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

(७) ज्या उमेदवारांना भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरावयाचे आहे असे उमेदवार अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर करणा-या उमेदवारांनी त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

**७.९** प्रस्तुत परीक्षेपूर्वी ७ दिवस अगोदर उमेदवारास परीक्षेचे प्रवेशप्रमाणपत्र त्याच्या प्रोफाईलद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमेदवाराने परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

८...............

८. परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही. प्रस्तुत अधिसूचनेमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशिल दिलेला आहे. मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी अर्ज स्वीकारण्याची पध्दत आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया,परीक्षा योजना, अभ्यासक्रम इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशिलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील स्पर्धा परीक्षेअंतर्गत उमेदवारांना सर्वसाधारण सूचना तसेच स्पर्धा परीक्षा विभागातील महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा परीक्षामध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती अधिकृत समजण्यात येईल.

**१०. विहित पध्दतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्याची कार्यवाही, तसेच भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही दिनांक ४ जानेवारी, २०१४ रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.**

**११. चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक ६ जानेवारी, २०१४ पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.**

१२. महाराष्ट्र अभियांत्रिकी (स्थापत्य) सेवा, गट-अ (मुख्य) परीक्षेचा अभ्यासक्रम व योजना आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १९ डिसेंबर, २०१३.**

**मा.पां. जाधव**
**अवर सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग.**

**आयोगाच्या कार्यालयात,परीक्षा कक्षात,परीक्षा केंद्राच्या परिसरात,तसेच,शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.**